शुक्रवार
१४.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३०८
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955



## धनंजय मुंडेंच्या अडचणीत वाढ

### कोर्टाने बजावली कारणे दाखवा नोटीस



**मुंबई । वृत्तसेवा**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा मास्टरमाईंड असा आरोप होत असलेल्या वाल्मिक कराडमुळे मंत्री धनंजय मुंडेंच्या यांच्या अडचणी वाढल्या आहेत. विरोधकांसह सत्ताधारी पक्षातील काही नेते त्यांच्या राजीनाम्याच्या मागणी करत आहेत. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी देखील राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. अशातच आता मुंडेंच्या अडचणीत आणखी वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. कारण मंत्री धनंजय मुंडे यांना कोर्टाने कारणे दाखवा नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे. विधानसभा निवडणुकीच्या उमेदवारी अर्जात मुंडेंनी माहिती लपवल्याचा आरोप करुणा शर्मा यांनी केला होता. या तक्रारीनंतर परळीच्या फौजदारी न्यायालयाने धनंजय मुंडेंना कोर्टाने कारणे दाखवा नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे. राजीनामाच्या मागणी जोर धरत असतानाच न्यायालयाने बजावलेल्या आदेशामुळे धनंजय मुंडेंच्या अडचणी वाढल्याचं दिसत आहे. २४ फेब्रुवारीला परळीच्या फौजदारी न्यायालयात सुनावणी होणार आहे.



#### नेमकं प्रकरण काय?

धनंजय मुंडे यांनी २०२४ च्या परळी विधानसभा निवडणुकीसाठी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जासोबतच्या शपथपत्रात पत्नी राजश्री मुंडे यांच्या तीन मुली तर करुणा मुंडेंच्या दोन मुलांचा उल्लेख केला होता. परंतु करुणा मुंडे यांच्या नावावरील मिळकतीबाबत कुठलाही उल्लेख केला नव्हता. यावर आक्षेप घेत करुणा मुंडे यांनी परळीतील फौजदारी न्यायालयात ऑनलाइन तक्रार केली होती. त्यानंतर न्यायालयाने आता या तक्रारीची दखल घेत नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे.

## मुंडेंविरोधात रान उठवणाऱ्या धसांना अजितदादांनी टाळले?

**मुंबई । वृत्तसेवा**



बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणानंतर भाजप आमदार सुरेश धस यांनी आक्रमक पवित्रा घेतला. त्यांनी धनंजय मुंडेंविरोधात रान उठवलं त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. तसेच जिल्ह्यातील विविध गैरप्रकार, गुन्हेगारी आणि जिल्हा नियोजन समितीच्या भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करताना मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे तक्रार करणार असल्याचे म्हटले होते. त्यापद्धतीने ते आज (ता.१३) अजित पवार यांची भेट घेण्यासाठी मुंबईला गेले होते. मात्र त्यांची भेट अजित पवार यांनी टाळली आहे. यामुळे रिकाम्या हातांनी धस यांना बीडला निघावे लागले आहे. बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्याप्रकरण, पीक विमा घोटाळा, हार्वेस्टर घोटाळा आणि इतर अनेक घोटाळ्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील मंत्री धनंजय मुंडेंचे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा हात असल्याचे उघड झाले आहे. तसेच येथे जिल्हा नियोजन समितीमधील विविध कामात देखील भ्रष्टाचार झाल्याचा आरोप धस यांनी केला होता. याबाबतच ते तक्रार आणि खुलासा करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भेटण्यासाठी निघाले होते. मात्र अजितदादांनी धस यांची भेट टाळली आहे. धस यांनी जिल्हा नियोजन समितीमधील विविध कामात देखील भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला होता. त्यांनी, धनंजय मुंडे सामाजिक न्याय विभागाचे मंत्री असताना २०१९-२०२४ या कालावधीत भ्रष्टाचार झाल्याचा दावा केला होता. तसेच धस यांनी भ्रष्टाचारातील ७२ कोटी रुपयांची बोगस बिले पुरावा म्हणून अजित पवारांना दिली आहेत. याच जिल्हा नियोजन समितीमधील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी धस यांनी केली होती. ते यासाठी अजित पवार यांना भेटणार होते. पण आता अजित पवार यांनी वेळ नाकारत भेट टाळल्याने त्या काळातील चौकशी होणार का? भ्रष्टाचाराला खो मिळणार की याप्रकरणात तडक कारवाई होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागेल आहे. तर सुरेश धस आता काय भूमीका घेतात हे ही महत्त्वाचे ठरणार आहे.

## तिरुमलाचे जनरेटर चोरणाऱ्यांना बेड्या

**बीड । प्रतिनिधी**



येथील एमआयडीसी, मोंढा भागातील तिरुमला ऑईल मिल मधून जनरेटर चोरी करून घेवून जात असतांना नागरिकांनी दोन चोरट्यांना पकडले होते. याप्रकरणात सदाशिव कुटे यांच्या फिर्यादीवरून सुधाकर गित्ते, (रा.अयोध्य नगर, परळी) आणि अमोल देंगे (रा. वंजारवाडी, ता. गेवराई) या दोघांविरुध्द पेठ बीड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. यावेळी त्यांच्याकडून जनरेटरसह गुन्ह्यात वापरलेला टेम्पो, क्रेन जप्त करून दोघांनाही अटक करण्यात आली आहे. पेठ बीड भागातील एमआयडीसी परिसरात असलेल्या तिरुमाला ऑईल मिलजवळ (दि. १२) फेब्रुवारी रोजी टेम्पो क्रमांक एम.एच.१२, ई. क्यू. २८४१ हा उभा होता. त्याचवेळी क्रेन क्रमांक एम.एच.१८, ए. एन. ३८५० च्या सहाय्याने दोन इसम ऑईलमिलमधील जनरेटर काढत असतांना दिसून आले. नागरिकांनी त्यांना हटकले आणि दोघांनाही पकडून ठेवले. याबाबतची माहिती मिळाल्यानंतर पेठ बीड ठाण्याचे पोलिस देशमुख, सोनवणे, नशीर शेख, कलिम इनामदार, ▶▶पान २ वर

## सुरत-चेन्नई महामार्गाच्या भुसंपादनाचा मार्ग मोकळा

### दोन दिवसात उठणार स्थगिती ; खा.सोनवणेंनी घेतली गडकरी यांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकारची भारतमाला परियोजना या महत्वाकांक्षी योजनेच्या पहिल्या टप्प्यामधे सुरत-चेन्नई महामार्ग जात आहे. हा राष्ट्रीय महामार्ग बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातून प्रस्तावित आहे. या महामार्गासाठी सर्वेक्षणाचा काम पुर्ण झालेले असून भुसंपादनाच्या कामास केंद्र सरकारने स्थगिती दिलेली आहे. सदरील स्थगिती उठवावी, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन ▶▶पान २ वर



## सोयाबीनची दहा दिवसांपासून खरेदी बंद



**बीड । प्रतिनिधी**

सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या घरातलं सोयाबीनचं शेवटचं पोतंही राज्य शासन खरेदी करेल, असे मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले खरे मात्र सहा जानेवारीपासून नाफेडचे सोयाबीन खरेदी केंद्र राज्य शासनाने बंद केल्यामुळे गेल्या दहा दिवसांपासून सोयाबीन उत्पादक शेतकरी सोयाबीन विक्रीसाठी नाफेड केंद्राबाहेर वाहनांच्या रांगा लावून ताटकळत असल्याचे चित्र अंबाजोगाईच्या हनुमंतवाडी शिवारात पहायला मिळत आहे. रात्रीतून सोयाबीन चोरीस जाऊ नये म्हणून शेतकऱ्यांना ▶▶पान २ वर

## उत्पन्न वाढीसाठी दारू दुकाने वाढवायचा धंदा मांडू नका

### ॲड.अजित देशमुख यांचा शासनाला इशारा

**बीड । प्रतिनिधी**



अजित पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क मंत्री पद हाती घेतल्यानंतर पहिल्यांदा त्यांच्याकडे राज्यातील दारूची दुकाने वाढवण्याचा प्रस्ताव सादर झाला. बीड जिल्ह्यात ज्याप्रमाणे खैरात वाटल्यासारखे दारू दुकाने वाटली गेली, तीच परिस्थिती राज्यात करू नका. दारुमुळे हजारो नव्हे तर लाखो कुटुंब उद्ध्वस्त झालेली आहेत. त्याचा विचार करून केवळ उत्पन्न वाढीचे कारण दाखवून सरकारने दारू दुकाने वाढू नयेत. तर भ्रष्ट भ्रष्टाचाराने बरबटलेला कारभार सुधारण्याचा प्रयत्न करावा, असा इशारा जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड.अजित एम. देशमुख यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला दिला आहे. लोकांना दारू पाजण्यासाठी जास्तीत जास्त दारूची दुकाने स्थापन करणे म्हणजे लाखो कुटुंब उद्ध्वस्त करणे आहे. अगोदरच राज्यात आत्महत्यांचे प्रमाण वाढले असून याला देखील शासनाचेच काम ▶▶पान २ वर

## संजय गांधी,श्रावणबाळ योजनेतील निराधारांचे अनुदान तात्काळ वितरीत करा

### आ.संदीप क्षीरसागरांचे तहसिलदारांना निर्देश

**बीड । प्रतिनिधी**



संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी या व अशा प्रकारच्या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान तात्काळ वितरीत करण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासार तहसिलदार यांना दिले आहेत. बीड विधानसभा मतदारसंघातील बीड शहर, बीड ग्रामीण व शिरूर कासार तालुक्यातील लाभार्थ्यांना गेल्या अनेक दिवसांपासून संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्ती वेतन योजना या सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे अनुदान मिळालेले नाही. या योजनेचे लाभार्थी म्हणजे गरजू, निराधार आणि दुर्बल असतात. त्यांचे जीवनमान या अनुदानावर अवलंबून असते. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांचे लाभार्थ्यांना अनुदान मिळाले नसल्याने ▶▶पान २ वर

## परळीतील धर्मापुरीत १४ लाखांचा गुटखा पकडला



**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील धर्मापुरी येथील एका किराणा दुकानात परळी ग्रामीण पोलिसांनी बुधवारी दुपारी छापा टाकून १४ लाख रुपये किमतीचा तंबाखूजन्य पदार्थ व गुटखा (दि. १२) रोजी रात्री जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या गुटक्याची अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी हे तपासणी करून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करणार आहेत. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलीस सूत्राकडून सांगण्यात आले. धर्मापुरी येथील एका किराणा दुकानात गुटखा विक्री चालू असल्याचे माहिती परळी ग्रामीणचे पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलीस निरीक्षक मजहर सय्यद, सहाय्यक पोलीस निरीक्षक समाधान कवडे, पोलीस उपनिरीक्षक रियाज शेख लाल, निमोणे, विष्णू घुगे, पांडुरंग वाले, गोविंद बडे सुनील अन्नमवार यांच्या पथकाने (दि. १२) फेब्रुवारी रोजी रात्री या किराणा दुकानावर छापा टाकला. यावेळी शासनाची बंदी असलेला ▶▶पान २ वर

## मराठा आंदोलक म्हणून कारवाई करणार असाल तर खपवून घेणार नाही; मनोज जरांगेंचा इशारा



**जालना । प्रतिनिधी**

कुणबी नोंदी सापडलेल्या राज्यातील पात्र मराठा समाजाला मराठा-कुणबी, कुणबी-मराठा प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही निश्चित करणाऱ्या माजी मुख्य न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीला तब्बल दीड महिन्यानंतर मुदतवाढ देण्यात आली आहे. या समितीची मुदत ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपली होती. सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय जारी करून समितीला ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली. यातच अलीकडेच आमरण उपोषण स्थगित केल्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांचे अंतरवाली सराटीत १५ फेब्रुवारीपासून बेमुदत साखळी उपोषण सुरू होणार असून, त्याचे लोण राज्यभरात पसरणार आहे. यातच मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा इशारा दिला आहे. राज्यात मराठा आरक्षणाचे आंदोलन पेटल्यानंतर राज्य सरकारने सप्टेंबर २०२३ मध्ये मराठा समाजाला मराठा-कुणबी, कुणबी-मराठा ▶▶पान २ वर


### जे प्रमाणपत्र रोखून धरले ते तात्काळ दिले पाहिजे

राज्य सरकारने शिंदे समितीला मुदत वाढ दिली. आता त्या समितीला मनुष्यबळ द्या. समितीला बसवून ठेवू नका. फक्त मुदत वाढ देऊन उपयोग नाही. आता महाराष्ट्रभर ही समिती गेली पाहिजे. समितीने नोंदी शोधल्या पाहिजे. समितीला बसण्यासाठी कक्ष दिले पाहिजे. त्यांना निधी कमी ▶▶पान २ वर




# मडकी तपासून घ्या!

कोणत्याही पक्षाचे सरकार असो. त्यास आपल्या विचारांची माणसे जवळ करावीत असे वाटणे काही गैर नाही. अशी जवळ केली जाणारी माणसे त्या त्या विचारांचे झेंडे उघडपणे खांद्यावर घेऊन असतात असे नाही. पण त्यांच्या अभिव्यक्तीतून त्या त्या विचारांचा प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष सुगावा लागत असतो. हे ठरवून होते वा केले जाते असे म्हणता येणार नाही. पण तसे होते. त्यामुळे त्या त्या व्यवस्थेचे शहाणपण, बौद्धिक उंची या अशा जवळ केल्या गेलेल्यांच्या मूल्यमापनातून होत असते. म्हणून आपण जवळ करीत असलेली व्यक्ती नीट जोखणे, तिच्या वैचारिक निष्ठांपलीकडे जाऊन तिची बौद्धिक खोली/ उंची मापणे गरजेचे. ही किमान तपासणी न केल्यास काय होते याची दोन उत्तम उदाहरणे समोर दिसतात. एक राहुल सोलापूरकर आणि दुसरे रणवीर अलाहाबादिया. यातील रणवीर हा अलीकडच्या काळातील अत्यंत लोकप्रिय यूट्यूबर. नवतरुण वर्गात तो चांगलाच परिचित. हे नमूद अशासाठी केले कारण त्याचा प्रेक्षकवर्ग लक्षात यावा म्हणून. पण राहुल सोलापूरकर यांच्याविषयी असे काहीच म्हणता येत नाही. ते वर्तमानात नक्की काय करतात किंवा त्यांची इतिहासातील कामगिरी काय याचा परिचय त्यांचे निकटवर्तीय वा शेजारी-पाजारी यांना तरी असेल किंवा काय हा प्रश्न. 'सामना' चित्रपटातले मास्तर हिंदुरावांच्या पैलवानास ''आपल्या सुंदर बिनडोकपणाचं रहस्य काय'' असा प्रश्न विचारतात. राहुलरावांना तोही विचारण्याची सोय नाही, इतके त्यांचे काम अनुल्लेखनीय. अलीकडे समाजमाध्यमांच्या उदयामुळे आणि दूरचित्रवाणी वाहिन्यांनी निर्बुद्धीकरणाबाबत समाजमाध्यमांशी स्पर्धा सुरू केल्यामुळे अनेक तोंडाळांस बरे दिवस आले आहेत. हे राहुल आणि रणवीरही या वाचाळ-काळाची फळे. एरवी या स्तंभाने दुर्लक्षावे इतकीच खरे तर यांची लायकी. तथापि या दोघांपेक्षा अशांना जवळ करणाऱ्या विचारधारेवर भाष्य करणे अगत्याचे असल्याने या अर्धवटरावांचा उल्लेख करावा लागतो याबद्दल खंत व्यक्त करून ही प्रस्तावना आटोपती घेणे इष्ट. यातील सोलापूरकर काय काय बरळले याचा उल्लेख नव्याने करण्याची गरज नाही. दुसरीकडे रणवीर त्याच्या कार्यक्रमातील सहभागीस ''तू पालकांना दररोज संभोग करताना पाहात बसशील की एकदा मध्ये पडून त्यांना कायमचे थांबवशील?'' अशा अर्थाचा प्रश्न केल्याने संकटात पडला. नैसर्गिक शरीरधर्माविषयी बोलणे बिनडोकोत्तमांचे लक्षण. हा कार्यक्रम म्हणे विनोदी होता. रणवीरच्या या विधानात काय विनोद होता, हे त्याचे त्यास ठाऊक. यावर कोणा संस्कृतिरक्षकाने तक्रार केल्याने हा प्रकार गाजू लागला आणि संस्कृतिरक्षकांनी ठिकठिकाणी त्याच्याविरोधात पोलिसांत तक्रारी दाखल करणे सुरू केले. खरे तर ज्याप्रमाणे यात विनोद नाही त्याचप्रमाणे या विरोधात पोलिसांत तक्रार दाखल करावी असेही काही नाही. मूर्खांचे अतिमूर्ख बरळणे इतकेच त्याचे स्वरूप. या अशा कार्यक्रमांस पाहणारे दिवसागणिक भूमिती श्रेणीने वाढणाऱ्या याच मूर्खसंप्रदायाचे प्रतिनिधी. त्यातही परत हा रणवीर अव्वल नाही. परदेशी 'ओजी क्रू' (ओरिजिनल गँगस्टर) या कार्यक्रमात सॅमी वॉल्श आणि ॲलन फँग यांनी अवघ्या काही आठवड्यांपूर्वी असाच्या असा प्रश्न केला होता आणि तो जसाच्या तसा या रणवीरने उचलला. हे असे करताना आपण कोणत्या देशात आहोत, पालक, त्यांची लैंगिकता इत्यादी विषयांची चर्चा करणे अब्रह्मण्यम असते इतकेही भान या रणवीरास राहिले नाही. त्यावर वादळ उठल्यानंतर माझे जरा चुकलेच असे म्हणत त्याने माफी मागून टाकली. अवाढव्य राहुलराव आणि पोरगेलासा रणवीर यांच्या प्रमादात हे एक साम्य. आणि दुसरे साम्य म्हणजे या मंडळींस जवळ करणारे! हे उभयता स्वतंत्रपणे काही विशिष्ट कार्यक्रम, संस्था यांच्या व्यासपीठांवर दिसतात. यातील राहुलरावांनी ताज्या वादळानंतर 'भांडारकर प्राच्यविद्या संस्थे'च्या विश्वस्तपदाचा राजीनामा दिला. ते योग्यच. पण या पंडिती संस्थेच्या विश्वस्तपदी या इसमास मुदलात नेमले कोणी? त्यांचे त्या क्षेत्रातील योगदान काय? अलीकडे काहीही बरळण्यास संशोधन असे म्हणतात काय? तसे नसेल तर इतक्या ऐतिहासिक



आणि अत्यंत महत्त्वाच्या संस्थेच्या विश्वस्तपदी राहुलरावांची नेमणूक होतेच कशी? या प्रश्नाचे उत्तर विश्वकोश मंडळावर करण्यात आलेल्या नियुक्त्या पाहिल्यास मिळेल. साध्या अंकलिपी निर्मितीपासूनही ज्यांस चार हात दूर ठेवायला हवे त्यांच्या हाती विश्वकोश निर्मिती सुपूर्द केली जात असेल तर कोणाविषयी काय बोलणार? यातून असे करणाऱ्यांची केवळ वैचारिक आपलेपण शोधण्याची अपरिहार्यता तेवढी दिसून येते. या रणवीरच्या बाबतही हेच. त्याच्या पॉडकास्टला याच वैचारिक आपलेपणाच्या भावनेतून कोणी कोणी हजेरी लावली त्यांची नावे पाहिली तरी हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. विदुषी सुश्री स्मृती इराणी, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मुत्सद्दी एस. जयशंकर, नितीन गडकरी, पीयूष गोएल अशी किती नावे घ्यावीत? वास्तविक पत्रकारिता वा तत्सम क्षेत्रांत इतके मान्यवर आपल्याकडे आहेत की त्यातील कोणांस या मान्यवरांनी मुलाखती देणे अधिक सयुक्तिक ठरले असते. पण त्या सगळ्यांपेक्षा हा रणवीर या मंडळींस जवळचा वाटला. कारण? अर्थातच वैचारिक जवळीक. हे विचार-सौहार्द येथेच थांबत नाही. गेल्या वर्षी ८ मार्चला राजधानीत भारत मंडपम येथे त्याचा सत्कार साक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केला गेला. पंतप्रधानांनी जाहीरपणे त्याचे कौतुक केले आणि त्याची परतफेड या रणवीरने ''मोदीजी यूथ की बाते करते है'' अशा गौरवोद्गाराने केली. याच 'यूथ की बात'ने त्यास आणि त्याच्या एकेकाळच्या समर्थकांस अखेर संकटात टाकले. पंतप्रधानांनी त्या कार्यक्रमात या रणवीरला शांत झोपेची गरज समजावून सांगितली. त्याची परतफेड या रणवीरने झोप उडवणाऱ्या वक्तव्याने केली. हे होणारच होते. याचे कारण बौद्धिक वा अन्य कर्तृत्वापेक्षा केवळ विचारधारेवरून 'आपला', 'त्यांचा' करण्याची सध्याची राजकीय सवय. गुणवान हा गुणवान असतो. तो कोणत्याही विचारांचा असला तरी त्याचा सन्मानच व्हायला हवा आणि तो राज्यकर्त्यांनी वैचारिक कारणांसाठी केला नाही तरी अंतिमत: या असल्या गणंगांपेक्षा इतिहासाच्या विशाल पटलावर खऱ्या गुणवंतांचीच स्वाक्षरी राहते. हे असले राहुलराव आणि रणवीर पैशाला पासरीभर मिळतात. त्यांची नावे बदलत राहतात, इतकेच. दुसरी एक बाब आवर्जून यानिमित्ताने नमूद करायला हवी. ती म्हणजे या तथाकथित समाजमाध्यमी प्रभावक (इन्फ्लुएन्सर्स) वावदूक उच्छृंखलांच्या मागे राजकारण्यांनी इतके फरपटत जावे? अलीकडे राजकारणी स्वत:च्या आणि पक्षीय प्रचारासाठी या इन्फ्लुएन्सरांना जवळ करतात. हा खरे तर त्यांचा पराभव. समाजमाध्यमांतील क्षणिक लोकप्रियतेचा फायदा उठवण्यासाठी त्यांच्याकडून या असल्यांना जवळ केले जाते आणि नंतर हे किती पोकळ आहेत हे दिसल्यावर त्यांचीच अडचण होते. या असल्या सोम्यागोम्या पुरस्कार सोहळ्यांस पंतप्रधानांनी उपस्थिती लावावी? शिंगे मोडून ही मंडळी आणखी किती काळ वासरात मिसळत राहणार? तेव्हा जे झाले त्याबद्दल चौकशी, पोलीस तपास वगैरे निरर्थक गोष्टींपेक्षा राजकारण्यांनी स्वत:स आणि स्वत:च्या जबाबदारीस अधिक गांभीर्याने घ्यावे. 'निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे' असे म्हणणारे संत गोरा कुंभार समोर संत-महंत आले तरी त्याचे डोके 'तपासून' मडके कच्चे की पक्के, ते सांगत. सत्ताधीशांनी तो आदर्श बाळगावा. तरच 'तव झालो प्रसंगी गुणातीत' याचा साक्षात्कार होईल. त्यासाठी आपल्यासमोरील मडकी तपासून घेणे महत्त्वाचे.

# डोळ्यात पाऊस दाटून मॉडेल इंग्लिश हाय स्कूलच्या विद्यार्थ्यांची भविष्याकडे वाटचाल!

बीड, (प्रतिनिधी):- दिनांक १३ फेब्रुवारी रोजी सफदर आली वेल्फेअर ट्रस्ट संचलित मॉडेल इंग्लिश हाय स्कूलच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ जल्लोषात पार पडला. ज्यात निरोप समारंभाच्या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव सुजात आली देखमुख, महाराष्ट्र कॉंग्रेस प्रदेश सेक्रेटरी फरीद सर देशमुख, संस्थेच्या कर्तव्यनिष्ट प्राचार्य प्रिया सुकुमारन, सफदर अली वेल्फेअर ट्रस्ट संचलित डॉ.जकिर हुसेन शाळेच्या प्राचार्या शेख फरीदा बाजी,सफदर आली देशमुख, अमानत आली देशमुख, चंदन पठाण सर यांची उपस्थिती होती. प्रस्तावनेत संस्थेच्या प्राचार्या प्रिया सुकुमारन बोलतांना म्हणाल्या,



विद्यार्थ्यांनी आपल्या कवेत कर्तुत्व साठवून येणाऱ्या भविष्याकडे निर्भिडपने वाटचाल केली पाहिजे. वाटेत येणाऱ्या संकटांना बगल देत ज्याला प्रवास पूर्ण करता येतो त्याच्याच नशिबी यश पेरलं जातं. चंदन पठाण सर यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मौल्यवान असं मार्गदर्शन केलं. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रात आपला आलेख घडवण्यासाठी मॉडेल इंग्लिश हाय स्कूलने आजवर कार्य केलं आहे. शाळेच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाला शिक्षक, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोबतच शिक्षकांनी आपले अनुभव सांगून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय आठवणींना उजाळा देत, शिक्षक आणि मित्रमंडळींप्रती कृतज्ञता व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांनी गाणी आणि विनोदपूर्ण किस्से सादर करून वातावरण हलकेफुलके केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत स्मृतिचिन्हे व गिफ्ट्स देण्यात आले. आभारप्रदर्शनाने समारंभाची सांगता झाली. संपूर्ण वातावरण हृदयस्पर्शी आणि आनंददायी होते.

# कै.पार्वतीमाता यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज धनंजय म.चव्हाण यांचे कीर्तन

गेवराई, (प्रतिनिधी):- शहरात कै.सौ.पार्वतीमाता सखारामजी काळे यांच्या द्वितीय पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त शुक्रवार, दि.१४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १२ यावेळेत श्री.ह.भ.प. धनंजय महाराज चव्हाण यांचे कीर्तन सेवा होणार आहे. तरी भक्त परिवाराने माता पार्वती धाम, दारलूमच्या पाठीमागे गेवराई येथे उपस्थित रहावे असे आवाहन काळे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. कै.सौ.पार्वतीमाता सखारामजी काळे यांच्या द्वितीय पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त माता पार्वती धाम, दारलूमच्या पाठीमागे गेवराई येथे शुक्रवार, दि.१४ फेब्रुवारी रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सकाळी १० ते १२ यावेळेत श्री.ह.भ.प.धनंजय महाराज चव्हाण यांची कीर्तन सेवा होणार आहे. कीर्तनानंतर दुपारी १ ते ४ यावेळेत उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. तरी नागरिकांसह माँ संतोषी भक्त परिवाराने उपस्थित रहावे असे आवाहन समस्त काळे परिवार व माता पार्वती प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.



# कॉंग्रेसने भाकरी फिरवली,नाना युगाचा अस्त

## स्वच्छ चेहऱ्याच्या हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपद!

मुंबई, (वृत्तसेवा):-महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सपाटून मार खाल्ल्यानंतर कॉंग्रेस पक्षाने भाकरी फिरवली आहे. नाना पटोले यांना अध्यक्षपदावरून दूर सारत स्वच्छ प्रतिमा असलेले विदर्भातील नेते हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडे महाराष्ट्र कॉंग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे सोपविण्यात आली आहेत. तसेच विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून विजय वडेट्टीवार यांची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे पक्षाचे प्रदेशाध्यक्षपद आणि विधिमंडळ पक्षनेतेपद ही दोन्ही पदे विदर्भाकडेच असणार आहेत, हे विशेष. महाविद्यालयीन जीवनापासूनच गाडगे महाराज,तुकडोजी महाराज व गांधीवादी - सर्वोदयी कार्यकर्ता म्हणून परिचित आहेत. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस संलग्नित राजीव गांधी पंचायत राज संघटनचे विद्यमान अध्यक्ष आहेत. भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघटना च्या माध्यमातून राजकीय जीवनात सक्रीय झाले. महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष राहिलेले आहेत. त्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून बी.कॉम व बी. पी.एड पदवी धारण केलेली आहे. शेतकरी कुटूंबातून आलेले असून सामाजिक कार्य व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. ग्राम स्वराज्याच्या संकल्पपूर्तीसाठी महाराष्ट्रात सुरू केलेल्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत त्यांनी विशेष योगदान दिले आहे. ग्रामस्वच्छता तथा आदर्श ग्राम निर्माण या क्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

पान १ वरून

### तिरूमलाचे जनरेटर...

धनवडे व इतरांनी त्याठिकाणी येवून दोघांना ताब्यात घेतले. याप्रकरणी सदाशिव ज्ञानोबा कुटे यांच्या फिर्यादीवरून सुधाकर त्रिंबकराव गित्ते, (वय ३८), रा. अयोध्या नगर, परळी आणि अमोल उध्दव देंगे, वय ३१, रा. वंजारवाडी, ता. गेवराई या दोघांविरुध्द पेठ बीड पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) + प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे.

### सुरत-चेन्नई...

गडकरी यांची भेट घेत केली. यावेळी दोन दिवसात ही स्थगिती उठवू, असे आश्वासन मंत्री नितीन गडकरी यांनी दिले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. दि.१३ फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली येथील संसद कार्यालयामधे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेत सुरत-चेन्नई महामार्गाचा विषय मांडला. यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, प्रस्तावित सुरत-चेन्नई महामार्ग प्रकल्पासाठी भूसंपादन वेळेवर सुरू करणे महत्वाचे आहे. हा महामार्ग जिल्ह्यातील विविध भागातून जात असल्याने येथील विकासाला चालना मिळेल. प्रस्तावित महामार्ग बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील नांदूर, बाळेवाडी, कुंभेफळ, खुंटेफळ पुंडी, चिंचोली पुंडी, टाकळी अमिया, रूई नालकोल, नांदा, निमयगाव चोभा, धिर्डी, केळसांगवी, शिराळ, इमनगाव, खानापूर, चिखली, वाळूज, पारगाव, जोगेश्वरीतून पुढे जामखेड या गावातून जातो आणि जिल्ह्यातील प्रमुख महामार्गांपैकी एक असणार आहे. या प्रकल्पाचे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी, प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी आणि कॉरिडॉरवरील आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी खूप महत्त्व आहे. या महामार्गाचे सर्वेक्षण झालेले आहे. परंतु २३ नोव्हेंबर २०२३ रोजी भुसंपादनाच्या कामाला स्थगिती देण्यात आलेली होती. सदरील पत्रात अतिरिक्त दायित्वे निर्माण करण्यापूर्वी भारतमाला परियोजनेचा टप्पा-१ अंतर्गत आवश्यक मंजुरी मिळवण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. बीड जिल्ह्यात लवकरात लवकर भूसंपादन सुरू करणे आवश्यक आहे. प्रस्तावित सुरत-चेन्नई महामार्ग हा एक महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. जो बाजारपेठेपर्यंत पोहोचण्यात सुधारणा करून, रोजगाराच्या संधी निर्माण करून आणि प्रादेशिक विकास वाढवून मोठ्या लोकसंख्येला फायदा देईल. भूसंपादन प्रक्रियेच्या मंजुरीसाठी आणि त्यानंतरच्या सुरुवातीसाठी आवश्यक पावले उचलण्यात यावीत, असे म्हटले आहे. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी खासदारांच्या आग्रही मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन दोन दिवसात भुसंपादन प्रक्रिया चालू करण्यात येईल, असे आश्वासन दिले. खा.बजरंग सोनवणे हे रेल्वे सोबतच जिल्ह्यातील महामार्गाच्या कामांना गती मिळावी, यासाठी प्रयत्न करत आहेत.

### सोयाबीनची दहा...

रात्र जागून काढावी लागत आहे तर ज्या वाहनातून सोयाबीन खरेदी केंद्रावर आणला आहे त्या वाहनांना रोज हजार ते दोन हजार रुपये द्यावे लागत आहेत. गेल्या दहा दिवसात दहा हजारापेक्षा जास्त रुपयांचे भाडे शेतकऱ्यांना भुर्दंड म्हणून पडले आहे. बीड जिल्हयातल्या परळी, अंबाजोगाई तालुक्यांसह अन्य भागांमध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणावर सोयाबीनचा पेरा झाला. उत्पन्नही बऱ्यापैकी झाले मात्र निवडणुकीपूर्वी सोयाबीनला पाच ते सात हजार रुपयांचा भाव देऊ म्हणणाऱ्या राज्य सरकारने सोयाबीनला पाच हजारापेक्षा कमी आणि हमीभाव दिला. सोयाबीन खरेदीसाठ नाफेडचे खरेदी केंद्रही जिल्ह्यात काही भागात उघडण्यात आले. अंबाजोगाई तालुक्यातील हनुमंतवाडी शिवारामध्ये नाफेडचे खरेदी केंद्र आहे. शासनाने सहा जानेवारीला हे खरेदी केंद्र बंद केले. मात्र तेव्हा सोयाबीन विकीसाठी शेकडो शेतकरी या खरेदी केंद्रावर रांगा लावून होते. आज पर्यन्त त्या शेतकऱ्यांचं सोयाबीन शासनाने खरेदी केला नाही. गेल्या दहा दिवसांपासून शेतकरी नाफेडच्या खरेदी केंद्राबाहेर सोयाबीनसह ताटकळत बसून आहेत. ज्या वाहनांतून शेतकऱ्यांनी विक्रीसाठी सोयाबीन आणले आहे त्या वाहनाला रोज हजार ते दोन हजार रुपये भाडे द्यावे लागते. आतापर्यंत दहा हजारापेक्षा जास्त भुर्दड तेथील शेतकऱ्यांवर पडला आहे. रात्रीतून सोयाबीनची चोरी होऊ नये म्हणून शेतकऱ्यांना रस्त्यावर रात्र जागून काढावी लागत आहे. शेतकऱ्यांचे हाल होत असताना बीड जिल्हा प्रशासन आणि राज्य शासन बीड जिल्ह्यातल्या या शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. नाफेडने पुन्हा खरेदी सुरू करून हनुमंतवाडी शिवारात सोयाबीन विक्रीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेकडो शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान अणि मानसिक ताण तात्काळ दूर करावा, अशी मागणी होत आहे.

### उत्पन्न वाढीसाठी...

पान १ वरून

जबाबदार आहे. आता आणखी दुकाने वाढली तर एक पिढी बरबाद होईल. या सर्व पार्श्वभूमीवर ड. देशमुख यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सचिव आणि संबंधितांना एक तातडीचे निवेदन पाठवले असून समाज विघातक निर्णय घेऊ नये, अशी मागणी केली आहे. राज्य सरकारला उत्पन्न वाढीसाठी जर दारू दुकाने द्यायचे असतील तर ते चुकीचे आहे. राज्यात प्रत्येक खात्यात भ्रष्टाचार वाढला आहे. बीड जिल्ह्यात तर वाढलेल्या भ्रष्टाचाराने थैमान घातले आहे. हे बंद करण्याचा विचार राज्य शासन करत नाही. तर समाज आणखी खड्ड्यात घालण्यासाठी दारू दुकाने वाढवण्याचा विचार केला जात आहे. यातून राज्य शासन आणि प्रशासनातील लोकांना मोठ्या प्रमाणात मलिदा मिळेल. मात्र हा मलिदा पापाचा ठरणार आहे. आणि याचा परिणाम देखील संबंधितांना भोगावा लागेल. राज्य शासनाने दारू दुकाने वाढवण्यासाठी आलेला प्रस्ताव तातडीने फेटाळून लावावा आणि तसेच जनतेसमोर तसे जाहीर करावे. अन्यथा येत्या निवडणुकांमध्ये याचा शासनाला जबर फटका मोजावा लागेल, असेही ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

### संजय गांधी, श्रावणबाळ...

मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे सदरील योजनेच्या लाभार्थ्यांना त्यांनामिळणाऱ्या अनुदानाची रक्कम तात्काळ वितरीत करा असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड व शिरूर कासारचे तहसिलदार यांना दिले आहेत.

### परळीतील धर्मापुरीत...

गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ येथे आढळून आले. याची किंमत अंदाजे १४ लाख रुपये आहे. हा सर्व गुटखा परळी ग्रामीण पोलिसांनी जप्त केला आहे. गुटख्याची अवैध विक्री करणारे दोघेजण असून त्यांच्या विरोधात गुरुवारी रात्री परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होणार असल्याचे एका पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. सदरची कारवाई सय्यद मजहर पोलीस निरीक्षक, ग्रामीण पोलीस ठाणे, ए.एस, आय, कवडे, पी, एस, आय, निमोणे, पी, एस.आय. शेख, सुंदर केंद्रे, पांडुरंग वाले, विष्णु घुगे, तुळशीराम परतवाड, सुनिल अन्नमवार, शंकर वाघमारे, अश्रुबा नागरगोजे, महादु गित्ते, किशोर गायकवाड, आदिनाथ डापकर, विकास गडदे, पुरी मॅडम, गणेश दहिफळे, सोपान दहिफळे, नितीन होळंबे, मानाजी मुंडे यांनी केली. अधिक तपास पोलीस करत आहेत.

### मराठा आंदोलक...

जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत आवश्यक त्या अनिवार्य पुराव्यांची वैधानिक आणि प्रशासकीय तपासणी करून पात्र व्यक्तींना कुणबी जातीचे जात प्रमाणपत्र देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी शिंदे यांची समिती नेमली होती. सुरुवातीला या समितीला एक महिन्याची मुदत देण्यात आली होती. मात्र, समितीची कार्यकक्षा वाढल्यानंतर कामाची व्याप्ती लक्षात घेऊन समितीला डिसेंबर २०२३ पर्यंत पहिली मुदतवाढ देण्यात आली होती. समितीने मराठवाड्यातील नोंदीबाबतचा आपला अहवाल डिसेंबर २०२३ मध्ये सरकारला सादर केला होता. यावर मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ✲ मराठा आंदोलक म्हणून कारवाई करणार असाल तर खपवून घेणार नाही : १५ तारखेपासून उपोषणाचे आमचे ठरले होते. त्यामुळे गावकऱ्यांशी चर्चा करणार आहे. त्यानंतर त्या संदर्भात निर्णय जाहीर करू. परंतु आता मागण्या मान्य करायला लागले म्हणून आम्ही बोलणार नाही. फक्त तुम्ही खोटे करू नका, हे आमचे मागणे आहे. तुम्ही मराठा आंदोलन म्हणून कुणालाही नोटीस नाही देऊ शकत नाही. त्यांच्यावर दुसरे काही प्रकरण असेल तर ठीक आहे. परंतु मराठा आंदोलन म्हणून खपवून घेणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. दरम्यान, जालना जिल्ह्यात वाळू माफिया आणि गुन्हेगारांवर प्रशासनाने तडीपीरीची कारवाई केली आहे. जालना प्रशासनाने नऊ जणांविरोधात कारवाई केली, यामध्ये मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा मेहुणा विलास खेडकर याचाही समावेश आहे. तसेच जरांगे पाटील यांच्या आंदोलनातील ५ जणांचा समावेश आहेत.

### जे प्रमाणपत्र रोखून...

पडता कामा नये. सगळ्या व्हॅलिडिटी झाल्या पाहिजे. जे प्रमाणपत्र रोखून धरले ते तात्काळ दिले पाहिजे. शासनाने हैदराबाद गॅझेट लागू करतो, असे सांगितले आहे. बॉम्बे गव्हर्मेंट आणि सातारा संस्थान हे आता शिंदे समितीकडे आहे. सरकार त्याच्यावर अभ्यास करणार आहे. गॅझेटचा अभ्यास शिंदे समितीने केलेला आहे. आता सरकारला करायचा आहे. त्यामुळे गॅझेटच्या अंमलबजावणीची वाट आम्ही आता पाहत आहोत, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले.




Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com